**शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना**
**संगणक प्रमाणपत्र सादर करण्यापासून**
**सूट प्राप्त होण्यासाठी वयोमर्यादा .....**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
**शासन निर्णय, क्रमांक : सेप्रनि- २००२/प्र.क्र.१४/०२/१२,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : **२ सप्टेंबर, २००३**

**वाचा:-** शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक : सेप्रनि-१०९८/ प्र.क्र.७/९८/१२, दि.२५.१.१९९९.

## शासन निर्णय

शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक :सेप्रनि-१०९८/प्र.क्र.७/९८/१२, दि.२५.१.१९९९ अन्वये शासकीय सेवेतील गट "अ", "ब" आणि "क" मधील अधिकारी/कर्मचारी यांनी संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान प्राप्त करुन विहित प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य ठरविण्यात आले आहे. तथापि, वयाचे ५५ वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास असे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. सदर वयोमर्यादेत बदल/सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्य विचाराधीन होता. याबाबत सर्वंकष विचार करुन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, सध्या शासन सेवेत असलेल्या गट "अ", "ब" आणि "क" मधील वयाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळेल.

२. सदरहू निर्णयानुसार दि.२५.१.१९९९ च्या अधिसूचनेत आवश्यक ती सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( बा. बा. नारायणकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

कृ. मा. प.

* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* सचिव,महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,

मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व हक्कदारी), मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व हक्कदारी),नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग (सामान्य प्रशासन विभाग धरुन),
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. (दोन प्रती प्रसिध्दीसाठी)
निवडनस्ती कार्यासन बारा.

*पत्राने.